| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 01 Dec 2025 | Danger of air pollution, missed heartbeat | Maharashtra Times |

# वायुप्रदूषणाचा धोका चुकवी काळजाचा ठोका

**देशातील वाढते प्रदूषण ही आता केवळ पर्यावरणीय समस्याच राहिली नसून, ती थेट आरोग्य आणि अर्थकारणावर घाव घालत आहे. वाढत्या 'एक्यूआय'मुळे श्वसनाचे आजार, हृदयविकार आणि हॉस्पिटलायझेशनचे प्रमाण झपाट्याने वाढताना दिसत आहे. उपचारखर्चांमुळे कुटुंबांची आर्थिक स्थिती काही दिवसांतच कमकुवत होते. त्यामुळे या बदलत्या वातावरणात आरोग्यविमा हा पर्याय नसून, आरोग्य आणि आर्थिक स्थैर्याचा आवश्यक आधारस्तंभ ठरतो.**




अमरनाथ सक्सेना
Matawealth@timesofindia.com


हवेची गुणवत्ता आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य दोन्ही थेट प्रभावित करते. अलीकडे देशभरात 'एअर क्वालिटी इंडेक्स' अर्थात 'एक्यूआय' पातळी झपाट्याने वाढली आहे. 'स्टेट ऑफ ग्लोबल एअर रिपोर्ट २०२५'नुसार, भारतात २०२३मध्ये हवा प्रदूषणामुळे दोन लाखांहून अधिक मृत्यूंची नोंद झाली. महाराष्ट्रातही परिस्थिती काही वेगळी नसून, मुंबईने 'गंभीर' पातळी गाठली आहे. प्रदूषित हवेत दीर्घ काळ राहिल्यास दमा, ब्राँकायटिस आणि 'क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज'सारख्या (सीओपीडी) श्वसनाच्या समस्या आणखी बिकट होतात. मोठ्या प्रदूषणामुळे हृदयविकार आणि स्ट्रोक आदी 'कार्डिओव्हॅस्क्युलर' समस्यांची लागण होऊ शकते.

लक्षणे दिसताच तत्काळ वैद्यकीय तपासणी करणे खूप महत्त्वाचे ठरते. योग्य वेळी हॉस्पिटलायझेशन आणि उपचार मिळाल्यास आरोग्य सुधारू शकते; मात्र, उपचाराच्या खर्चांचा आर्थिक भार कुटुंबांचे गणित बिघडवू शकते. अशा खर्चांमुळे बचत पटकन कमी होते. त्यामुळे अनेकांना गुंतवणूक काढावी लागणे, शेअर्स विकणे, मुदत ठेवी मोडणे किंवा 'एसआयपी' बंद करणे आदी कठीण निर्णय घ्यावे लागतात. याचा परिणाम केवळ शारीरिक आरोग्यावरच नव्हे, तर आर्थिक स्थिरतेवरही होतो. या अडचणींत इन्शुरन्स हे एक प्रभावी माध्यम कामी येते. उपचारखर्च मिळण्याची हमी मिळाल्यानंतर संबंधित व्यक्ती तत्काळ वैद्यकीय मदत घेते.

## आरोग्यविम्याचे वरदान

वायुप्रदूषणाच्या जोखमीपासून आरोग्यविमा कसा मदत करतो, ते पाहू या...

**१) ओपीडी सल्लामसलत** : खराब हवेच्या गुणवत्तेमुळे अनेकदा श्वसनाच्या समस्या वाढतात आणि दमा, ब्राँकायटिस, सीओपीडी आणि अॅलर्जी आदी आजारांमध्ये वाढ होऊ शकते. याशिवाय हृदयविकाराच्या रुग्णांवरसुद्धा याचा अतिरिक्त ताण पडतो. अशा काळात डॉक्टरांकडे जाण्याचे प्रमाण वाढते आणि नियमित ओपीडी सल्लामसलत आवश्यक बनते. वैद्यकीय तज्ज्ञांकडून लवकर तपासणी केल्यास लक्षणे प्रभावीपणे हाताळण्यास मदत होते आणि गुंतागुंत होण्याची शक्यता कमी होते. पॉलिसीच्या अटींनुसार सल्लामसलत, लिहून दिलेली औषधे आणि आवश्यक चाचण्यांचा समावेश करून आरोग्य विमा महत्त्वाची भूमिका बजावतो. यामुळे लक्षणे दिसताच लोकांना तत्काळ वैद्यकीय काळजी घेता येते आणि प्रदूषणाच्या काळातही आवश्यक उपचार पुढे ढकलावे लागत नाहीत.

**२) श्वसनविकारांसाठी संरक्षण** : हवेतील वाढते प्रदूषण आज आरोग्याच्या दृष्टीने गंभीर विषय बनला आहे. फक्त श्वसनाच्या समस्या नव्हे, तर हृदयविकार आणि स्ट्रोक आदींमुळे गुंतागुंतीची स्थिती निर्माण होऊन तत्काळ वैद्यकीय उपचारांची गरज असते. अशा वेळी आरोग्य विमा तुमच्या पाठीशी उभा राहतो; जेणेकरून आवश्यकतेनुसार, योग्य ठिकाणी गुणवत्तापूर्ण उपचार मिळू शकतात.

**३) प्रतिबंधात्मक तपासणी आणि आरोग्य कार्यक्रम** : अनेक आरोग्य विमा योजनांमध्ये वार्षिक आरोग्य तपासणी, निदान तपासणी आदी प्रतिबंधात्मक आणि स्वास्थ्यकेंद्रित सेवादेखील मिळतात. हे मूल्यांकन आरोग्याशी संबंधित धोके लवकर ओळखण्यास, बदलत्या आरोग्याच्या पद्धतींचे निरीक्षण करण्यास आणि निरोगी सवयी अंगीकारण्यास मदत करतात. प्रतिबंधक उपायांवर लक्ष केंद्रित करून व्यक्ती प्रदूषणाचे दीर्घकालीन परिणाम अधिक प्रभावीपणे हाताळू शकतात आणि आपल्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी सुज्ञ पावले उचलू शकतात.

**४) क्रिटिकल इलनेस कव्हर** : फुप्फुसाचा कर्करोग, हृदयविकार, स्ट्रोक किंवा अवयव निकामी होणे आदी गंभीर आजारांचे निदान झाल्यास, 'क्रिटिकल इलनेस कव्हर' तुम्हाला एकरकमी रक्कम प्रदान करतो. ही रक्कम रिकव्हरीदरम्यान वैद्यकीय आणि बिगर-वैद्यकीय खर्च हाताळण्यास मदत करते. हा लाभ नियमित हॉस्पिटलायझेशन कव्हरेजपेक्षा वेगळा असतो आणि अतिरिक्त संरक्षण; तसेच मनःशांतीसाठी आवश्यक ठरतो. प्रदूषणाशी संबंधित श्वसन आणि कार्डिओव्हॅस्क्युलर स्थितींसाठी अनेकदा वेळेवर वैद्यकीय उपचार आवश्यक असतात. त्यामुळे खर्च वाढतो आणि कुटुंबाच्या बजेटवर ताण येतो. अशा परिस्थितीत आरोग्य विमा महत्त्वाची भूमिका बजावतो.

प्रतिबंधात्मक सेवा आणि विस्तृत संरक्षणामुळे आरोग्य विमा लवकर वैद्यकीय मदत घेण्यास प्रोत्साहन देतो, गुंतागुंतीची शक्यता कमी करतो आणि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य मिळवून देतो. प्रदूषणाची पातळी सतत वाढत असताना, आरोग्य विम्याकडे केवळ आर्थिक उत्पादन म्हणून नव्हे, तर एकूणच आरोग्य संरक्षण, सुरक्षितता आणि सुख-समाधानाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहणे आवश्यक आहे.


**(लेखक बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडचे चीफ टेक्निकल ऑफिसर (कमर्शियल) आहेत.)**